**विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद**

महसूल शाखा

---

**विषय- COVID-१९ विषाणुच्या प्रादुर्भावामूळे पसरलेली रोगराई नियंत्रित करण्यासाठी उपाययोजना करण्यासाठी निधी वितरीत करण्याबाबत...**

जा.क्र.२०१९/मशाका/नेआर/सिआर-९ दि.२६.३.२०२०

वाचा-

१) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.सीएसएस-२०२०/प्र.क्र.१२३/म-३, दि.१६.०३.२०२०

२) कक्ष अधिकारी महसूल व वन विभाग यांचे पत्र क्र.एससीवाय-०३/२०२०/प्र.क्र.२७/म-११, दि.१६.०३.२०२०

३) या कार्यालयाचे आदेश दि.१७.०३.२०२०

**प्रस्तावना-**

देशात व राज्यामध्ये COVID-१९ विषाणुचा प्रादुर्भाव झाल्यामूळे रोगराई नियंत्रित करण्याची आवश्यकता विचारात घेवून आवश्यक उपाययोजना करण्यासाठी राज्य कार्यकारी समितीची दिनांक १६ मार्च २०२० रोजी मुख्यसचिव यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत राज्य कार्यकारी समितीने घेतलेल्या निर्णयानूसार COVID-१९ विषाणुच्या प्रादुर्भावामूळे पसरणारी रोगराई नियंत्रित करण्यासाठी विलगीकरण कक्ष स्थापन करणे, त्यासाठी तात्पुरती निवासी व्यवस्था करणे, अन्न, कपडे, वैद्यकीय देखभाल इत्यादी तसेच अतिरिक्त चाचणी प्रयोगशाळा स्थापन करण्याचा खर्च, अग्निशमन, पोलीस, स्थानिक स्वराज्य संस्था व आरोग्य सेवेतील कर्मचाऱ्यांच्या संरक्षणासाठी प्रतिरोधक साधनांचा खर्च व व्हेंटीलेटर, हवा शुध्दीकरण यंत्र, थर्मल स्कॅनर्स व इतर साधनांचा खर्च भागविण्यासाठी सर्व जिल्हयांना राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून निधी वितरीत करण्याकरिता उपरोक्त संदर्भ क्र.१ वरिल शासन निर्णयान्वये निधी रुपये ५००.०० लक्ष पैकी रुपये ४५०.०० लक्ष इतका निधी विभागातील सर्व जिल्हाधिकारी यांना वितरीत करण्यात आलेला आहे. आता या कार्यालयाच्या स्तरावर राखीव ठेवण्यात आलेला रुपये ५०.०० लक्ष इतका निधी विभागातील सर्व जिल्हयांशी झालेल्या चर्चेअंती वितरीत करण्याची बाब विचाराधीन होती, त्यानूसार सदर निधी वितरीत करण्यात येत आहे.

**आदेश-**

१) देशात व राज्यामध्ये COVID-१९ विषाणुचा प्रादुर्भाव झाल्यामूळे रोगराई नियंत्रित करण्याची आवश्यकता विचारात घेवून आवश्यक उपाययोजना करण्यासाठी दिनांक १६ मार्च २०२० रोजी राज्य कार्यकारी समितीने घेतलेल्या निर्णयानूसार COVID-१९ विषाणुच्या प्रादुर्भावामूळे पसरणारी रोगराई नियंत्रित करण्यासाठी खालील बाबींवरील खर्च भागविण्यासाठी संदर्भ क्र.३ अन्वये उपायुक्त (सामान्य प्रशासन ) याचेकडे राखीव ठेवण्यात आलेला निधी रुपये ५०.०० लक्ष इतका निधी जिल्हाधिकारी यांना वितरीत करण्यात येत आहेत.

अ) बाधित झालेल्या व्यक्तींसाठी विलगीकरण कक्ष (घरातील विलगीकरण वगळून ) स्थापन करणे, त्यासाठी तात्पुरती निवासी व्यवस्था करणे, अन्न, कपडे, वैद्यकीय देखभाल, नमुने गोळा करण्यावरील खर्च, तपासणी / छाननी व contact tracing साठी सहाय्य इत्यादी.

ब) शासनाच्या अतिरिक्त चाचणी प्रयोगशाळा स्थापन करण्याचा खर्च व उपभोग्य वस्तू (consumables) अग्निशमन, पोलीस, स्थानिक स्वराज्य संस्था व आरोग्य सेवेतील कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक संरक्षणासाठी प्रतिरोधक साधनांचा खर्च व व्हेंटीलेटर, हवा शुध्दीकरण यंत्र, थर्मल स्कॅनर्स व इतर साधनांचा खर्च.

## विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद
महसूल शाखा

**विषय- COVID-१९ विषाणुच्या प्रादुर्भावामूळे पसरलेली रोगराई नियंत्रित करण्यासाठी उपाययोजना करण्यासाठी निधी वितरीत करण्याबाबत...**

जा.क्र.२०१९/मशाका/नैआ२/सिआर-९ दि.२६.३.२०२०

२) राज्य कार्यकारी समितीने घेतलेल्या निर्णयानुसार वरील बाबींवरील खर्च भागविण्यासाठी खालील तक्त्यातील स्तंभ क्र.४ मध्ये दर्शविल्यानूसार विभागातील जिल्हाधिकारी यांना खालीलप्रमाणे निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

रक्कम लाखात

| अ.क्र. | जिल्हा | यापूर्वी वितरीत करण्यात आलेला निधी | आता वितरीत करण्यात येत असलेला निधी | एकूण वितरीत निधी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | औरंगाबाद | १००.०० | ००.०० | १००.०० |
| २ | जालना | ५०.०० | १०.०० | ६०.०० |
| ३ | परभणी | ५०.०० | १०.०० | ६०.०० |
| ४ | हिंगोली | ५०.०० | १०.०० | ६०.०० |
| ५ | नांदेड | ५०.०० | ००.०० | ५०.०० |
| ६ | बीड | ५०.०० | १०.०० | ६०.०० |
| ७ | लातूर | ५०.०० | ००.०० | ५०.०० |
| ८ | उस्मानाबाद | ५०.०० | १०.०० | ६०.०० |
| | एकूण | ४५०.०० | ५०.०० | ५००.०० |

(अक्षरी रुपये पन्नास लक्ष फक्त)

३) वरिल निधी खर्च करतांना राज्य शासनाच्या इतर विभागाच्या योजनांमधून खर्चाची द्विरुक्ती होणार नाही याच दक्षता जिल्हाधिकारी तसेच आरोग्य यंत्रणेने घ्यावी. उपरोक्त परिच्छेद अ (अ) मधील वैद्यकीय देखभालीवर होणारा खर्च राष्ट्रीय आरोग्य अभियानामधून देखील करण्यात यावा. या संदर्भात केंद्र शासनाच्या गृह मंत्रालयाच्या दिनांक १४.०३.२०२० च्या पत्रातील सुधारीत सुचना विचारात घेण्यात याव्यात. सदर पत्राची प्रत सोबत जोडली आहे.

४) सदर निधी सन २०१९-२० या आर्थिक वर्षात मागणी क्र.सी-६, २२४५, नैसर्गिक आपत्ती निवारणार्थ खर्च, (९१) (०४) इतर बाबी, ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) (२२४५०२४४) अंतर्गत या लेखाशीर्षातर्गत पुर्नविनियोजनाने उपलब्ध करून घेण्यात आलेल्या निधीतून अर्थसंकल्पिय वितरण प्रणाली (BEAMS) द्वारे वितरीत करण्यात येत आहे. वरिल प्रयोजनासाठी होणारा खर्च, उपलब्ध करून देण्यात आलेल्या निधीच्या मर्यादेत भागविण्यात यावा. सदर निधी उपरोक्त लेखाशिर्षांतर्गत खर्ची टाकून त्याबाबतचा अहवाल उपयोगिता प्रमाणपत्र या कार्यालयास सादर करावा.

(मा.विभागीय आयुक्त यांचे मान्यतेने)

(पराग सोमण)
उपायुक्त (महसूल) २६/३
विभागीय आयुक्त कार्यालय,
औरंगाबाद

प्रति-

जिल्हाधिकारी जालना, परभणी, हिंगोली, बीड व उस्मानाबाद

प्रतिलिपी माहितीस्तव सादर-

**विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद**

महसूल शाखा

---

**विषय- COVID-१९ विषाणुच्या प्रादुर्भावामूळे पसरलेली रोगराई नियंत्रित करण्यासाठी उपाययोजना करण्यासाठी निधी वितरीत करण्याबाबत...**

जा.क्र.२०१९/मशाका/नैआर२/सिआर-९ दि.२६.३.२०२०

१. मा. सचिव, (मदत व पुनर्वसन), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

२. महालेखापाल, (लेखा परिक्षा / लेखा अनुज्ञेयता), नागपूर

३. अवर सचिव, म-११, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, १४ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई- ३२

प्रतिलिपी माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव.

१. सहाय्यक संचालक, ( ताळमेळ), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

२. जिल्हा कोषागार अधिकारी , जालना, परभणी, हिंगोली, बीड व उस्मानाबाद